.. Shri Rama Arati ..

# ॥ श्री राम आरती ॥

त्रिभुवनमंडितमाळ शोभतसे गळां ।
आरती ओवाळूं पाहूं ब्रह्मपुतळा ॥१॥

श्री राम जय राम जय जय राम ।
आरती ओवाळूं पाहूं सुंदर मेघश्याम ॥ धृ ॥

ठकाराचे ठाण करीं धनुष्यबाण ।
मारुती सन्मुख उभा कर जोडून ॥ श्रीराम ॥ २॥

भरत शत्रुघ्न दोघे चवऱ्या ढाळिती ।
स्वर्गीहूनी देव पुष्पवृष्टि करिती ॥ श्रीराम ॥ ३॥

रत्नखचित माणिक वर्णू काय मुगुटी ।
आरती ओवाळूं चवदाभुवनांचे पोटीं ॥ श्रीराम ॥ ४॥

विष्णुदास नामा म्हणे मागतो तूं ते ।
आरती ओंवाळू पाहू सीतापतीतें ॥ श्रीराम ॥ ५॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 23, 1999